कनिष्ठ सहाय्यक (लिपीक) गट-क संवर्गातील
कर्मचा-यांच्या सर्वसाधारण बदल्या व नेमणूका
करणेबाबत.

विनंती बदली २०२५

## जिल्हा परिषद अहिल्यानगर
## सामान्य प्रशासन विभाग

जिल्हा परिषद आदेश क्रमांक साप्रवि-१/आस्था-३/५१३/२०२५
अहिल्यानगर दिनांक १५/०५/२०२५

वाचा:- १. महाराष्ट्र शासन ग्रामविकास व जलसंधारण विभागाकडील शासन निर्णय क्र.जिपब-४१४/ प्र.क्र-११२/आस्था- १४ दि. १५/०५/२०१४.

२. महाराष्ट्र शासन ग्राम विकास व जलसंधारण विभागाकडिल शासन शुध्दीपत्रक क्रं.जिपब-४१४/ प्र.क्रं.११२/आस्था-१४, दि. ०२/०७/२०१४

३. ग्रामविकास विभागाकडील शुध्दीपत्रक क्र.जिपब-४८१६/प्र.क्र.१३६/आस्था-१४ दिनांक ०२/०१/२०१७

४. महाराष्ट्र शासन ग्रामविकास व जलंसधारण विभागाकडील शासन निर्णय क्र.जिपब-८१७/ प्र.क्र.२२८/आस्था-१४ दि. ०७/०३/२०१९.

५. सर्वसाधारण बदल्यांचे इतिवृत्त दिनांक १५/०५/२०२५

शासनाकडील संदर्भ क्रमांक १ च्या निर्णयामध्ये दिलेल्या मार्गदर्शक सूचनेनुसार, संदर्भ क्रमांक २ ते ४ अन्वयेचे शुध्दीपत्रक व तद्अनुषंगिक निर्णयातील तरतुदींनुसार, जिल्हा परिषदेअंतर्गत सामान्य प्रशासन विभागाच्या अधिनस्त कार्यरत असलेल्या कनिष्ठ सहाय्यक (लिपीक) गट-क या संवर्गातील कर्मचा-यांच्या समुपदेशनाने त्यांच्या नावा समोरील रकाना क्रमांक ४ येथून रकाना क्रमांक ५ मध्ये नमुद केलेल्या ठिकाणी **पती-पत्नी एकत्रिकरणांतर्गत विनंती** बदलीने पदस्थापना देण्यात येत आहे.

| अ.क्र. | कर्मचा-याचे नांव | पदनाम | सध्याचे कार्यरत ठिकाण | विनंती बदलीने दिलेले ठिकाण | बदलीचा प्रकार |
|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ |
| १ | श्री दराडे शिवहरी त्रिंबकराव | कनि सहा | गट शिक्षण कार्यालय पं स पाथर्डी | पंचायत समिती अकोले | पती- पत्नी एकत्रिकरण |

**वरील कर्मचा-यांना बदलीच्या ठिकाणी हजर होणेकामी आदेशाच्या दिनांकापासुन कार्यालयीन वेळेनंतर या स्तरावरुन एकतर्फी कार्यमुक्त करण्यात येत आहे.** संदर्भ क्र. १ मधील प्रकरण-१ मुद्दा क्र. ७ नुसार बदली होण्यापुर्वी ज्या ठिकाणी कर्मचारी कार्यरत होते त्या ठिकाणावरुन आदेशाच्या दिनांकानंतर वेतन व भत्ते अदा करु नयेत अन्यथा पदग्रहण अवधीत बदलीच्या पदावर रुजू न झाल्यास, अनुउपस्थितीचा कालावधी हा अकार्यदिन (dies non) म्हणून गणला जाईल.

तसेच बदली ही संपुर्ण प्रशासकीय बाब असल्याने कोणत्याही कर्मचा-याने राजकीय दबाव आणल्यास महाराष्ट्र जिल्हा परिषदा, जिल्हा सेवा (वर्तणूक) नियम १९६७ मधील नियम ६ (५) चा भंग केला म्हणून शिस्तभंगाची कारवाई करण्यात येईल. सदर बदली विनंतीने झाली असल्याने संबधीतांना पदग्रहण अवधी व बदली प्रवासभत्ता अनुज्ञेय नाही.

सदर आदेश अहिल्यानगर जिल्हा परिषदेच्या www.nagarzp.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असुन त्याचा संकेतांक २०२५०५१५०४००९४ असा आहे.

(आशिष येरेकर)
मुख्य कार्यकारी अधिकारी
जिल्हा परिषद अहिल्यानगर

प्रति,

संबधीत कनिष्ठ सहाय्यक (लिपीक)

द्वारा संबधीत कार्यालय प्रमुखांमार्फत

प्रतः- संबधीत कार्यालय प्रमुख ... (संबधित)

२/- उपरोक्त बदली झालेल्या कर्मचा-यास बदलीचे ठिकाणी हजर होणेसाठी पर्यायी व्यवस्था करुन तात्काळ कार्यमुक्त करावे व संबधीताचे वेतन आदेशाच्या दिनांकानंतर अदा करु नये, तसेच केलेल्या कार्यवाहीचा अहवाल या कार्यालयास सादर करावा.

प्रत - ................................ ....

प्रत - मुख्य लेखा व वित्त अधिकारी, जिल्हा परिषद अहिल्यानगर

प्रतः- निवड नस्ती

(आशिष येरेकर)

मुख्य कार्यकारी अधिकारी

जिल्हा परिषद अहिल्यानगर